


# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३५० वा गुरूवार दि २३ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# मुंबईत भाजपच्या मोर्चात महिलेचा राडा; महापौरांकडून नागरिकांची दिलगिरी, परवानग्यांबद्दलही केला खुलासा....

**वृत्तसंस्था/मुंबई**

नारीशक्ती वंदन विधेयकाला संसदेत विरोध केल्यामुळे भाजपने इंडिया आघाडीतील पक्षांविरोधात मुंबईतील वरळी इथं मोर्चाचं आयोजन केलं होतं. मात्र हा मोर्चा वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला. भाजपच्या या मोर्चामुळे वाहतूक कोंडी झाल्यामुळे एका संतप्त महिलेने भाजप नेत्यांसह पोलीस प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत गोंधळ घातला. या घटनेमुळे राजकीय आंदोलने आणि त्यामुळे रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी, हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. तसंच या मोर्चासाठी भाजपकडून रीतसर परवानगी घेण्यात आली होती की नव्हती, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी खुलासा करत नागरिकांना झालेल्या गैरसोयबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. वरळीतील आंदोलनाविषयी भूमिका मांडता रितू तावडे यांनी म्हटलं की,ङ्क्षङ्क्षकाल वरळी येथे आयोजित महिलांचा जनआक्रोश मोर्चा हा पूर्णपणे पूर्वनियोजित असून या मोर्चासाठी सर्व आवश्यक परवानग्या घेतल्यानंतरच हा मोर्चा काढण्यात आला होता. नागरिक व वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी पोलीस आणि वाहतूक विभागाकडून योग्य नियोजन देखील करण्यात आले होते. परंतु तरीही काही नागरिकांना झालेल्या गैरसोयीबद्दल मुंबईची प्रथम सेविका म्हणून मी दिलगिरी व्यक्त करते, असं तावडे यांनी म्हटलं आहे. ङ्क्षङ्क्षमी स्पष्ट सांगते की नारीशक्ती वंदन अधिनियम सुधारणा विधेयकाच्या विरोधाच्या माध्यमातून महिलांच्या राजकीय हक्कांवर गदा आणणाऱ्यांविरोधात हा आमचा ठाम आणि योग्य लढा आहे. महिलांना समान हक्क व राजकीय प्रतिनिधित्व नाकारण्याचा प्रयत्न आम्ही कदापि सहन करणार नाही. तप्त उन्हात राज्यभरातून हजारो महिला या मोर्चात सहभागी झाल्या, कारण हे केवळ आंदोलन नव्हतं, तर हा महिलांच्या हक्कांचा आक्रोश होता. त्यामुळे मोर्चात सहभागी झालेल्या प्रत्येक भगिनीचा आणि आमचा रोष ती भगिनी व सर्व नागरिक समजून घेतील, अशी माफ अपेक्षा व्यक्त करते, अशी भूमिका रितू तावडे यांनी मांडली. दरम्यान, आमच्या महायुती शासनाच्या प्रयत्नातून साकारलेले धर्मवीर, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प अर्थात कोस्टल रोड, सिंदूर रेल्वे उड्डाणपूल आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रेल्वे




उड्डाणपूल यासह विविध पूल व सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते या तून दक्षिण मुंबईतील दैनंदिन वाहतूक पूर्वीपेक्षा नक्कीच सुलभ झाली आहे. आमच्या कामाची दखल घेण्याऐवजी महिलांच्या हक्कांवर घाला घालणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे, हेच योग्य ठरेल,असा टोलाही रितू तावडे यांनी विरोधकांना लगावला आहे.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील तलाव मासेमारी ठेका प्रक्रिया सुरू; तोरणा तलावासाठी प्रस्ताव आमंत्रित

**जनसंचलन/बुलढाणा**

कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि. ३ जुलै २०१९ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत तलाव/जलाशय धोरण राबविण्यात येत असून, सन २०२६-२७ या वर्षाकरिता बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टरखालील तलावांपैकी तोरणा तलाव(११२ हेक्टर) मासेमारी ठेक्याने देण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदर तलावाची ठेका मुदत दि. ३० जून २०२६ रोजी संपुष्टात येत असून, शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार संबंधित कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीच्या मान्यतेने नवीन ठेका देण्याचा प्रस्ताव आहे. आवश्यक कागदपत्रे : सन २०२६-२७ या वर्षासाठी तलाव ठेका प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी विहीत नमुन्यातील अर्ज (तलाव ठेका नमुना-१) व संस्थेचा ठराव, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, उपविधी व नाहरकत प्रमाणपत्र, संस्था कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र, थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, संचालक मंडळाची यादी, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, बँक स्टेटमेंट व नफा-तोटा पत्रक, मागील ५ वर्षांचा मत्स्यबीज संचयन व उत्पादन अहवाल, इतर पूरक माहिती (किसान क्रेडिट कार्ड, विमा, ई-श्रम कार्ड, इ.), १० टक्के मत्स्यबीज संचयनासाठी अगाऊ धनादेश, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्य नसल्याचे प्रमाणपत्र, सविस्तर प्रकल्प अहवाल व हमीपत्र, नवीन ठेका प्रक्रियेस प्रारंभ,



यासोबतच पाटबंधारे विभागाच्या ज्या तलावांची ठेका मुदत दि. ३० जून २०२५ रोजी संपली आहे, त्या तलावांचेही नव्याने मासेमारी ठेक्याने वाटप करण्याची प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, इच्छुक संस्थांनी अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा कार्यालयाच्या नोटीस बोर्डची पाहणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचा आढावा; सहसंचालकांची कुष्ठ कार्यालयास भेट

**जनसंचलन/बुलढाणा**

सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठ) बुलढाणा कार्यालयास आज आरोग्य सेवा(कुष्ठ व क्षय, पुणे) सहसंचालक राजरत्न वाघमारे तसेच आरोग्य सेवा (राष्ट्रीय आरोग्य अभियान) मुंबई सहसंचालक डॉ. बी. एस. सोनावणे यांनी भेट दिली. भेटीदरम्यान कुष्ठरोग कार्यालयाकडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर श्री. वाघमारे यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा केली. कार्यालयातील दैनंदिन कामकाज, नव्या कुष्ठरुग्णांची नोंदणी, रुग्णांना औषधोपचार पुरवठा तसेच नोंदींची पडताळणी करण्यात आली. तसेच, शासनातर्फे राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध मोहिम (), कुसुम व स्पर्श अभियानांतील कामाचा आढावा घेण्यात आला. या मोहिमांदरम्यान कार्यालयाकडून वर्तमानपत्रे व सामाजिक माध्यमांद्वारे करण्यात आलेल्या जनजागृती उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. सहसंचालकांनी नव्या रुग्णांच्या शोधाबरोबरच रुग्णांच्या सहवासितांना प्रतिबंधात्मक उपचार () देण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामकाजादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेत त्या सोडविण्याबाबत आश्वस्त केले.यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, डॉ. खिरोडकर (वैद्यकीय अधिकारी), तसेच सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठ) कार्यालयातील डॉ. किसन राठोड (वैद्यकीय अधिकारी ), डॉ. ई. बी. शिंदे (अवैद्यकीय पर्यवेक्षक),

# उत्तेजकांची कीड...



भारतात सन २०३०मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा होत आहेत. त्यापूर्वी यंदा स्कॉटलंड येथे राष्ट्रकुल आणि जपानमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धा होत आहेत. या दोन्ही स्पर्धांमध्ये आघाडीच्या देशांत येण्याचे भारताचे लक्ष्य आहे.एकूणातच भारताची महत्त्वाकांक्षा आहे ती जागतिक क्रीडासत्ता होण्याची. मात्र भारताच्या या महत्त्वाकांक्षेपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे ते यशासाठी वाट्टेल ते करणारे ॲथलीट आणि त्याच्या प्रशिक्षकांनी. भारतीयांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांतील यशानंतर, या खेळाडूंनी उत्तेजकांचा वापर तर केला नाही हा, अशी शंका सातत्याने घेतली जाते. आता तर, ॲथलेटिक्स इंटेग्रिटी युनिटच्या नव्या निर्बंधामुळे अशा खेळाडूंच्या स्पर्धा सहभागावरच प्रश्नचिन्ह उभे राहील. ॲथलेटिक्सच्या जागतिक संघटनेशी संबंधित असलेल्या संस्थेने, भारतीय खेळाडू उत्तेजक घेण्याचा सर्वाधिक धोका आहे, असे म्हणत भारतास सर्वांत वाईट अशा ङ्गअफगटात टाकले आहे. यामुळे प्रत्येक स्पर्धेतील खेळाडूंची उत्तजेक चाचणी होऊनच त्यांना पाठवणे सक्तीचे असेल. शिवाय, भारतीय खेळाडूंना रक्तातील उत्तेजके तपासण्याच्या चाचणीसही सामोरे जावे लागेल. एवढेच नव्हे तर स्पर्धा नसताना, स्पर्धेपूर्वी आणि स्पर्धे दरम्यान त्यांच्या चाचण्या होत राहतील. दुसरीकडे, राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक चाचणी संस्थेच्या कार्यक्षमतेवर सतत प्रश्नचिन्ह उभे केले जाते. २०१०च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा संयोजनाच्यावेळीही हा प्रश्न आला होता. २०३६च्या ऑलिम्पिक संयोजनासाठी भारत तयार आहे. याबाबतची अधिकृत दावेदारी भारताने सादर केली, त्यावेळीही आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने उत्तेजकांच्या वाढत्या वापराकडे लक्ष वेधले होते. प्रत्यक्षात इतर देशांत चाचण्या व दोषींचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे : चीन (२४२१४ - ४३), जर्मनी (१५०८१ - ५४), फ्रान्स (११७४४ - ९१), रशिया (१०५१४ - ७६). त्याच वेळी, राष्ट्रीय उत्तेजक चाचणी प्रयोगशाळेसाठीची तरतूद २८ कोटी ५५ लाखावरून २३ कोटी करण्यात आली; तर राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्थेसाठीची तरतूद २४ कोटी ३० लाखावरून २० कोटी ३० लाख करण्यात आली. जागतिक पातळीवर यातून चांगला संदेश जात नाही. अशा स्थितीत उत्तेजकांची ही कीड ठेचण्यावाचून पर्याय नाही.

# बुलढाण्यात दिशा बैठकीत अधिकाऱ्यांना झाप!

## योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवाच

## ना. प्रतापराव जाधवांचा ठणकावून आदेश

**बुलढाणा**

केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी कागदावर न राहता प्रत्यक्ष तळागाळापर्यंत पोहोचलीच पाहिजे, अशा स्पष्ट शब्दांत केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा ङ्गदिशाफ समिती अध्यक्ष ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना झापले. जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडलेल्या दिशा बैठकीत त्यांनी विविध विभागांचा सविस्तर आढावा घेत प्रशासनाची चांगलीच कोंडी केली. पीक विमा, जलजीवन मिशन, मनरेगा, गृहनिर्माण, सौरवाहिनी, पोषण आहार योजना यांसह अनेक योजनांमध्ये गती नसल्याबाबत नाराजी व्यक्त करत त्यांनी थेट प्रश्न उपस्थित केले. ई-केवायसी पूर्ण न होणे, शेतकऱ्यांचे लाभ अडकणे, तसेच सीएससी आणि आधार केंद्रांवरील तक्रारींवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले. सिंचन प्रकल्पातील भूसंपादन व पुनर्वसनातील दिरंगाईवरही जाधव यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. लोकांच्या तक्रारी वाढू नयेत, अन्यथा कारवाई ठरलेलीच, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत ७१२ कोटींच्या पीक विमा वितरणासह विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. मात्र अंमलबजावणीत ढिलाई दिसताच प्रशासनाला तातडीने सुधारणा करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## तृणमूल काँग्रेसवर ‘महिलांचा विश्वासघात’ असा आरोप

# विधेयक फेटाळल्यानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

संसदेमध्ये राज्यघटना (१३१वी दुरुस्ती) विधेयक २०२६ मंजूर न होऊ देऊन तृणमूल काँग्रेसने महिलांचा विश्वासघात केला आहे, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील प्रचारसभेत केला. तर तमिळनाडूमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी महिला आरक्षणाचाच मुद्दा उपस्थित करत द्रमुकला लक्ष्य केले.

जनगणनेविनाच लोकसभा मतदारसंघांची फेररचना करून महिलांना आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक दोन-तृतियांश बहुमताअभावी शुक्रवारी फेटाळले गेले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात काँग्रेससह तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीका केली. त्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूच्या विधानसभा निवडणूक प्रचारात भाजपने तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक या प्रमुख विरोधी पक्षांना महिलांविरोधी ठरवण्याची रणनीती



आखल्याचे दिसत आहे

पश्चिम बंगालच्या बांकुरा येथील प्रचारसभेत बोलताना मोदी म्हणाले की, बंगालमधील महिला सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत शिक्षा देतील. ते म्हणाले, “आमची अशी इच्छा आहे की विकसित भारताच्या उभारणीत आमच्या मुलींची भूमिका विस्तारावी. अधिकाधिक संसदेत काय झाले ते तुम्ही पाहिले. तृणमूल काँग्रेसने पुन्हा एकदा बंगाली भगिनींचा विश्वासघात केला.” बंगाली महिला राज्यातील महाजंगलराजला आव्हान देत असल्यामुळे तृणमूल काँग्रेसने महिलांचा विश्वासघात केला, असा दावा मोदींनी केला.

दुसरीकडे, तमिळनाडूच्या इरोड येथे एका रोडशोदरम्यान बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनीही महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी द्रमुकला महिलाविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला. महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये राखीव जागा मिळू नये यासाठी काँग्रेस आणि द्रमुकने त्यांचा विश्वासघात केला, असा दावा शहा यांनी केला. मात्र, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार हा कट यशस्वी होऊ देणार नाही आणि देशातील महिलांना न्याय मिळेल याची आम्ही खबरदारी घेऊ असे शहा म्हणाले. तर वासुदेवनल्लुर येथे प्रचारसभेत बोलताना महिला आरक्षण लागू करण्यापासून आम्हाला कोणीही रोखू शकत नाही, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले. त्यांनीही या मुद्द्यावरून काँग्रेस आणि द्रमुकवर टीका केली.

पश्चिम बंगालच्या भगिनींना ३३ टक्के आरक्षण हवे होते आणि मोदींनी त्याची खबरदारी घेतली. त्यांना ते २०२९पासूनच लागू करायचे होते. पण तृणमूल काँग्रेसची तशी इच्छा नव्हती.

## भारताचे जहाज होर्मुझपार; गोळीबारानंतर दोन जहाजे माघारी

**नवी दिल्ली :** भारतीय मालकीच्या एका तेलवाहू जहाजाने सुरक्षितपणे होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली असून ते लवकरच मुंबईला पोहोचेल. त्याचवेळी इराणच्या ‘रिव्होल्युशनरी गाईस’ने भारताच्या दोन जहाजांवर गोळीबार केल्यामुळे भारताने शनिवारी इराणच्या राजदूतांना समन्स बजावून त्यांच्याकडे कठोर शब्दांमध्ये निषेध नोंदवला, तसेच व्यापारी जहाजांच्या सुरक्षेवर चिंताही व्यक्त केली. गोळीबारानंतर ही दोन्ही जहाजे सामुद्रधुनीतून माघारी देली.

देश गरिमा या तेलवाहू जहाजावर ३१ भारतीय नाविक आहेत. या जहाजाने शनिवारी होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली असून ते २२ एप्रिलपर्यंत मुंबईला पोहोचेल असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले. देश गरिमा हे जहाज ‘शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया’च्या (एससीआय) भारताच्या मालकीचे असून मार्चपासून सामुद्रधुनी ओलांडणारे १०वे भारतीय जहाज आहे. दुसरीकडे, सामनार हेरड हे अतिशय मोठे तेलवाहू जहाज आहे आणि जग अर्णव हे मोठे मालवाहू जहाज आहे. ही जहाजे होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न करत असत असताना रिव्होल्युशनरी गाईसने त्यांच्यावर गोळीबार केला. त्यानंतर ते पर्शियन आखातात माघारी फिरले. या घटनेनंतर दिल्लीमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला होता. याबरोबरच देश वैभव आणि देश विभोर या दोन तेलवाहू जहाजांनीही मार्ग बदलून ते पर्शियनच्या आखातात गेले.

## नाकेबंदीवरून तिढा; चर्चेसाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ आज पाकिस्तानमध्ये

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

इराणशी दुसऱ्या फेरीची चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ सोमवारी पाकिस्तानमध्ये दाखल होत आहे. याबाबतची माहिती अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरून दिली. करार दृष्टिपथात असला, तरी अमेरिकेची नाकेबंदी उठेपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी बंद ठेवण्याचा निर्णय इराणने घेतल्यामुळे वातावरण पुन्हा तापले आहे. अमेरिकेच्या नाकेबंदीमुळे पाकिस्तानमध्ये वाटाघाटीसाठी शिष्टमंडळ पाठवण्याचा इराणने कोणताही निर्णय घेतलेला नाही असे तेथील तस्निम वृत्तसंस्थेने नमूद केले आहे.

चर्चेच्या पहिल्या फेरीचे नेतृत्व करणारे उपाध्यक्ष जे.डी व्हान्स यांच्यासह अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि अध्यक्षांचे सल्लागार जेरेड कुशनर हे सोमवारी इस्लामाबादमध्ये दाखल होतील . सध्याची दोन आठवड्यांची शस्त्रसंधी २२ एप्रिल रोजी संपणार असताना ही चर्चा होत आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर गोळीबार केल्याने युद्धविरामाचे उल्लंघन झाल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला. तसेच, अमेरिकेला हवा असलेला करार इराणने केला नाही, तर नागरी पायाभूत सुविधा नष्ट करण्याची धमकी त्यांनी दिली. ‘इराणने करार केला नाही, तर अमेरिका इराणमधील प्रत्येक ऊर्जा प्रकल्प, पूल नष्ट करील,’ असे ते म्हणाले. इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम होण्यापूर्वी हेजबोला गटाबरोबर झालेल्या संघर्षात १५० जण ठार झाले. लेबनॉनच्या दक्षिण भागात इस्रायलने हल्ले केले. मृतांमध्ये अली रिदा अब्बास या म्होरक्याचा समावेश आहे. हेजबोलाने त्यांच्या कमांडरच्या मृत्यूच्या वृत्ताला पुष्टी दिली आहे.



### ‘होर्मुझ’वरून तणावात वाढ

अमेरिका-इराण यांच्यातील करार दृष्टिपथात असला, तरी होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून दोन्ही देशांतील संघर्ष पुन्हा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेची नौदल नाकेबंदी सुरू असेपर्यंत इराणनेही होर्मुझ सामुद्रधुनी पूर्ण बंद केली आहे. इराणच्या पार्लमेंटचे अध्यक्ष मोहंमद कालिबाफ म्हणाले, ‘इराणला दीर्घ काळ टिकणारी अशी शांतता हवी आहे. अमेरिकेवरचा अविश्वास ही सध्या आमची मूळ समस्या आहे. मात्र, त्याच वेळी दीर्घ काळ टिकणाऱ्या शांततेसाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी आणि इराणचा अणुकार्यक्रम हे मतभेदाचे मुद्दे कायम आहेत. आम्ही सामुद्रधुनीतून कुठे जाऊ शकत नसू, तर इतर देशांनाही येथून जाणे कठीण आहे. अमेरिकेने नाकेबंदी उठवली नाही, तर होर्मुझमधील निर्बंध निश्चितच अधिक कडक करण्यात येतील. अमेरिकेने सामुद्रधुनीतील सुरुंग नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा युद्धविराम जवळपास संपुष्टात आला होता. अमेरिकेच्या या कृतीकडे इराण युद्धविरामाचे उल्लंघन या दृष्टिकोनातून पाहतो.’

## नवनीत राणा पोसलेली विषवल्ली, वडेट्टीवारांच्या वक्तव्याने नव्या वादाची शक्यता

**नागपूर, वृत्तसंस्था :**

महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारे विधेयक नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधानांसह भाजपच्या सर्वच नेत्यांनी कॉंग्रेसवर टिकेची झोड उठवत महिला विरोधी असल्याचा आरोप केला. आता भाजपच्या महिला नेत्या नवनीत राणा या जातीय विष पेरण्यासाठी पोसलेली आणि पाणी घालून जिवंत ठेवलेली विषवल्ली असल्याची खरमरीत टिका कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार रविवारी सकाळी नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. त्यांनी नवनीत राणा यांचा चांगलाच समाचार घेतला. नवनीत राणा या जात आणि धर्मात भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल, यासाठी पाणी घालून जिवंत ठेवण्यात येणारी विषवल्ली आहे, असे ते म्हणाले. महिलांवरील अत्याचारा संदर्भात जात आणि धर्म कुठे येतो? जो जात धर्म आणत असेल तो नालायक आणि हरामखोर असतो त्याला फाशी झाली पाहिजे. तिथे बुरख्यावाले



नव्हते असे नवनीत राणा कोणत्या आधारावर बोलल्या. तोंडात आले की काहीपण वाफा काढायचे का? या बाईची जीभ जातीयवादी आणि धर्मांध बनली आहे. लोकांनी निवडणुकीत पाडून जिरवली तरी अजून शुद्धीवर यायला तयार नाही. राणा यांना हनुमान चालीसाच्या दोन ओळी बोलता येत नाही ते हिंदू धर्माच्या गोष्टी बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली. खरात प्रकरणावर ब्र न काढणाऱ्या नवनीत राणा मुस्लिम तरुण दिसल्याबरोबर बावचाळल्यासारखी बोलतात. हे अत्यंत घृणास्पद आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

## “देशात मोदी आणि राज्यात फडणवीस दोघंही फेल आहेत”

**नागपूर, वृत्तसंस्था :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने नियमबाह्य, बेकायदेशीर आणि निवडणूक काळात आचारसंहितेचा भंग होईल असे वर्तन करत असतात. कायदा माझं काय वाकडं करणार या भूमिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी कायम असतात. देशाच्या पंतप्रधानांना खोटं बोलण्याचा एक भयंकर राष्ट्रीय आजार जडलेला आहे, असा घणाघात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला. सध्याच्या घडीला देशात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस पूर्णपणे अपयशी ठरले असून हे दोघेही फेल आहेत, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे.

२०२३ ला मंजूर झालेलं महिला आरक्षण विधेयक या सरकारने अद्याप अंमलात आणलेलं नाही. त्याबद्दल नरेंद्र मोदींनी देशाची माफी मागितली पाहिजे. मगरीचे अश्रू ढाळणं बंद करा. लोक आता फसणार नाहीत. राष्ट्राला संबोधन म्हणजे काय अर्थ होता? एक विधेयक आलं नाही म्हणून राष्ट्राला संबोधन करणं हा मूर्खपणा आहे. निवडणूक काळात प्रसारमाध्यमांचा गैरवापर केला गेला. जे छाती पिटून घेत आहेत, ढोंग करत आहेत त्यांनी २०२३ चं बिल का अंमलात आणलं नाही? मोदींनी कालच्या भाषणात ८६ वेळा काँग्रेसचं नाव घेतलं. ते काँग्रेसमुक्त भारत करायला निघाले होते, त्यांच्या नसानसांमध्ये काँग्रेस आहे. काँग्रेस शिवाय देशाला कुणी नेतृत्व देऊ शकत नाही हे मोदी सिद्ध करत आहेत असाही टोला संजय राऊत यांनी लगावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी काय बोलतात? याकडे देश आता गांभीर्याने पाहत नाही. ५४३ जागा जर दिल्या तर भाजपमधील थोर पुरुषांच्या जागा राखीव होऊ शकतात, असा टोला त्यांनी लगावला. मोदींना देश कायम पेटवायचा असतो, मग तो विषय लव्ह जिहादचा असो किंवा कुणी काय खावे यावरून असो. पुलवामामध्ये जवान शहीद झाले, तेव्हा तिथल्या महिलांचा आक्रोश त्यांना दिसला नाही, आता ही ढोंगं त्यांनी बंद करावीत कारण जग त्यावर हसतं आहे, असे संजय राऊतांनी म्हटले.

# TCS प्रकरणाची पुनरावृत्ती! नागपुरात धर्माची सक्ती करणाऱ्या संचालकाला बेड्या; पीडित तरुणींची पोलीस ठाण्यात धाव

**नागपूर, वृत्तसंस्था :**

विशिष्ट धर्माच्या चालीरितींचे पालन करण्यासाठी दबाव आणत कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी तरुणींना धमकी दिल्याचा संतापजनक प्रकार स्वयंसेवी संस्थेत चव्हाट्यावर आला. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या दोन वर्षांपासून हा प्रकार सुरू होता. राज्यात 'टीसीएस'सारख्या आयटी कंपनीत धर्माच्या नावाखाली सुरू असलेला प्रकार गाजत असतानाच उपराजधानीत घडलेल्या या घटनेने संताप व्यक्त होत आहे.

मानकापूर पोलीस हद्दीत ही घटना चव्हाट्यावर आली. या प्रकरणातील आरोपी हा एका स्वयंसेवी संस्थेचा संचालक आहे. धार्मिक कारणावरून त्याच्या दबावाला बळी न पडलेल्या महिला कर्मचाऱ्याचा त्याने विनयभंग देखील केला आहे. दोन वर्षांपूर्वी झालेल्या या प्रकारानंतर महिला कर्मचाऱ्याने पोलिसांत तक्रारही केली होती. विशिष्ट धर्माच्या चालीरितींचे पालन करण्यास नकार देल्यानंतर त्याने धमकी



दिल्याचे तरुणींनी पोलिसांत केलेल्या तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणात पोलिसांनी स्वयंसेवी संस्थेचा संचालक रियाझ काझी याला अटक केली आहे.

रियाझ काझी हा फिकर फाऊंडेशन आणि पढे हम पढाए हम या नावांनी स्वयंसेवी संस्था चालवतो. त्याच्या संस्थेत काही कर्मचारी कामाला असून त्यात काही तरुणींचादेखील समावेश आहे. जुलै २०२४ मध्ये त्याने एनजीओमध्ये काम करणाऱ्या तरुणीचा विनयभंग केला होता. तरुणीने त्याला

## चार तरुणींचा मानसिक छळ

रियाझ काझी बऱ्याच कालावधीपासून त्याच्याकडे काम करणाऱ्या तरुणींचा मानसिक छळ करत होता. त्याच्या गोष्टींना दाद न देणाऱ्या तरुणींना त्याने नोकरीवरून काढून टाकण्याची व चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याची धमकीदेखील दिली होती. त्याने कुटुंबियांनादेखील धमकी दिल्याचे तरुणींनी दिलेल्या तक्रारीत नमूद आहे. त्याच्या या कृत्यात रियाझसोबत आणखी कुणी सहभागी आहे, का याचा तपास पोलीस करत आहेत. तसेच त्याने इतरही कोणत्या तरुणींवर अशा प्रकारे दबाव आणला होता का या दिशेनेदेखील चौकशी केली जात आहे.

समज दिली होती. मात्र तरीदेखील तो वारंवार तिची छेड काढत होता. दरम्यान, कार्यालयातील तरुणींना तो वारंवार आपण पालन करत असलेल्या धर्माशी निगडीत चालीरितींची माहिती देत होता. त्यानुसार आचरण करण्याचा दबावही टाकत होता. त्याच्या वागण्याला कंटाळून काही तरुणींनी नोकरी सोडली. काही दिवसांपूर्वी रियाझने नोकरी सोडून गेलेल्या तरुणीच्या आईला फोन केला. त्याने तुमची मुलगी कशा रितीने वागते याविषयी आक्षेपार्ह भाषेचा वापर केला. हा प्रकार कळताच तरुणी एकत्रित आल्या व थेट पोलीस ठाण्यात धाव घेतली.

आरोपीविरोधात तक्रार झाल्यानंतर पोलिसांनी प्रकरण गंभीरतेने घेत चौकशीला सुरुवात केली. तेव्हा रियाझ काझीने धार्मिक चालीरितींचे पालन करण्यासाठी दबाव टाकल्याची बाब प्राथमिक तपासातून समोर आली. पोलिसांनी रियाझ काझीविरोधात गुन्हा दाखल करत त्याला रात्रीच अटक केली. त्याला रविवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. यासंदर्भात मानकापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार हरीश काळसेकर यांना विचारणा केली असता त्यांनी रियाझ काझीच्या अटकेला दुजोरा दिला.

## मैत्रीच्या नावाखाली लैंगिक छळ; तरुणाची आत्महत्या; गुन्हा दाखल

**हिंगोली/वृत्तसंस्था**

कळमनुरी तालुक्यातील वडगाव येथील २४ वर्षीय तरुणाने लैंगिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नांदेड पोलिस अधीक्षक कार्यालयातील लिपीकाविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, गावकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे तब्बल २२ तासांनी शवविच्छेदन करण्यात आले.

कळमनुरी तालुक्यातील वडगाव येथील नवनाथ लाखाडे (२४) आणि नांदेड येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात कार्यरत लिपीक अभिषेक सातपुते यांच्यात गेल्या आठ ते दहा वर्षांपासून मैत्री होती. मात्र या मैत्रीचे रूपांतर छळात झाल्याचा आरोप समोर आला आहे. शनिवारी (ता. १८) दोघे वडगाव व आखाडा बाळापूर परिसरात एकत्र फिरत होते. यावेळी सातपुते याने नवनाथ याच्याकडे अनैसर्गिक संबंध ठेवण्याचा तगादा लावल्याचे सांगितले जात आहे. पूर्वीही अशा प्रकारे त्रास दिल्याचा आरोप असून, वारंवार होणाऱ्या या दबावामुळे मानसिक ताण वाढला. अखेर या छळाला कंटाळून नवनाथ यांनी वडगाव शिवारात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. घटनेनंतर संतप्त कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी आरोपीवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय शवविच्छेदनास विरोध केला. त्यामुळे आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलीस उपाधिक्षक राजकुमार केंद्रे यांनी घटनास्थळी धाव घेऊन नागरिकांशी संवाद साधत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, नागनाथ लाखाडे यांच्या तक्रारीवरून रविवारी (ता. १९) अभिषेक सातपुते याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सुमारे २२ तासांनी शवविच्छेदन प्रक्रिया पार पडली. या घटनेने मैत्रीच्या नात्यातील विश्वासघात आणि वाढता मानसिक छळ याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

## लेखक संपत जाधव यांना मारहाण

**पुणे :** लेखक संपत जाधव यांना शिवीगाळ करुन पिस्तुलाचा धाक दाखविल्याची घटना सारसबाग परिसरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात घडली. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांकडून पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत दीपक कुंडलिक कसबे (वय ३५, रा. बिबवेवाडी) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मातंग समाजातील आरक्षणाबाबत सारसबाग येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात शनिवारी (१८ एप्रिल) रात्री बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. रात्री दहाच्या सुमारास बैठक संपल्यानंतर लेखक संपत गणपत जाधव तेथे थांबले होते. त्या वेळी आरोपींनी जाधव यांना शिवीगाळ केली. त्या वेळी तक्रारदार कसबे यांनी मध्यस्थी करुन आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी कसबे यांना शिवीगाळ करुन त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांना मारहाण केली. आरोपींनी पिस्तुलाचा धाक दाखविला..

## बुलडोझर कारवाईची हालचाल

**छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था**

शहरातील विविध गुन्ह्यांमधील आणि त्यातही खास करून अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या साखळीत सहभागी असलेल्या आरोपींच्या घरांवर कारवाई करावी, असा एक प्रस्ताव पोलीस आयुक्तालयाकडून महानगरपालिकेकडे तीन महिन्यांपूर्वीच पाठवण्यात आला होता. परंतु अद्याप त्यावर कुठलाही कार्यवाही झालेली नसली तरी चालू आठवड्यात या अनुषंगाने अंमलबजावणी होणार असल्याची माहिती आहे.

शहरात अमली पदार्थ विरोधी पथकाकडून मध्यंतरी कारवाईचे सत्र सुरू करण्यात आले होते. अमली पदार्थ विरोधी पथकही सक्रीय असून, यातील आरोपींवर मोक्काही लावण्यात येत आहे. त्यावर आणखी कडक कारवाई म्हणून आरोपींच्या मालमत्तेची माहिती घेऊन त्यातील बेकायदा बांधकाम असणाऱ्या घरांवर बुलडोझर चालवण्याची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. या संदर्भातील माहिती पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिली आहे. त्यांनी अमली पदार्थ तस्करीतील प्रमुख सूत्रधार असलेला शेख अश्पाक शेख ईसाक (रा. रवींद्रनगर, शहाबाजार), पठाण दाऊद मुनावर खान (रा. बायजीपुरा), सरफराज मिर्झा हाफीज बेग (रा. शहबाजार) यांना पकडून आणल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात घेतलेल्या पत्रकार बैठकीत ही माहिती दिली होती. अमली पदार्थ तस्करीतील सुमारे २१ आरोपींच्या घरांचे बांधकाम अतिक्रमित असल्याचा संशय असून, त्याची तपासणी करून कारवाईचा प्रस्ताव महापालिकेकडे पाठवण्यात आल्याचे सांगितले होते. याशिवाय जवळपास ३० पेक्षा अधिक विविध गुन्ह्यांमधील आरोपींच्या घराची, मालमत्तेची यादी तयार केल्याचेही सांगण्यात आले होते. मधल्या काळात महानगरपालिकेच्या निवडणुकीची आचारसंहिता होती. त्यानंतर निवडणूकही पार पडली. आता महापालिकेचा कारभार सुरू झालेला आहे. मागील आठवड्यात महापालिकेचे आयुक्तही बदलले आहेत. जी. श्रीकांत यांच्या जागी अमोल येडगे हे आयुक्त म्हणून आलेले आहेत. अमली पदार्थ तस्करीतील गुन्ह्याची व्याप्ती आणि संघटित स्वरूप लक्षात घेता अश्फाकच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे.

# बलात्कार करून खून करणाऱ्या काकाचा पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये खात्मा

**गाझियाबाद/वृत्तसंस्था**

टीला मोड परिसरात एका चार वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधम आरोपीचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला आहे. रविवारी रात्री झालेल्या या चकमकीत आरोपीला पोलिसांनी कंठस्नान घातले. विशेष म्हणजे, या आरोपीवर जाहीर करण्यात आलेली २५ हजार रुपयांची बक्षीस रक्कम वाढवून ५०००० रुपये केल्यानंतर अवघ्या २४ तासांत ही कारवाई करण्यात आली.

मुझफ्फरनगरचा रहिवासी असलेला हा आरोपी पीडित मुलीचा सख्खा काका होता. काही दिवसांपूर्वी त्याने आपल्या चार वर्षांच्या पुतणीला खाऊचे आमिष दाखवून पळवून नेले होते. घरात फक्त अंध आजोबा असताना त्याने या संधीचा फायदा घेतला. त्यानंतर त्याने मुलीवर बलात्कार करून गळा दाबून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह एका पार्क केलेल्या कारखाली फेकून दिला होता. या घटनेनंतर संपूर्ण



परिसरात संतापाची लाट उसळली होती.

डीसीपी धवल जैस्वाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, क्राईम ब्रँच आणि स्वॅट (SWAT) टीमला आरोपी टीला मोड परिसरात आपल्या दोन साथीदारांसह मोटारसायकलवरून येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बाधला नहर कट परिसरात नाकाबंदी केली. पोलिसांनी संशयित मोटारसायकलला थांबण्याचा इशारा केला असता, आरोपींनी पोलिसांवर थेट गोळीबार सुरू केला. वेगाने जाणारी मोटारसायकल घसरल्याने आरोपी खाली पडले, मात्र त्यांनी पळून न जाता झाडाझुडपांचा आडोसा घेत पोलिसांवर गोळीबार सुरूच ठेवला. पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला, ज्यामध्ये आरोपीच्या दोन्ही पायांना गोळ्या लागल्या. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या चकमकीच्या काही काळ आधीच सर्वोच्च न्यायालयाने गाझियाबाद पोलिसांच्या कार्यपद्धतीवर कडक ताशेरे ओढले होते. दुसऱ्या एका बलात्कार-खून प्रकरणाचा संदर्भ देत न्यायालयाने पोलिसांची भूमिका "संवेदनहीन आणि अमानवीय" असल्याचे म्हटले होते. या पार्श्वभूमीवर गाझियाबाद पोलिसांनी केलेली ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. चकमकीत नराधम काका मारला गेल्याची बातमी मिळताच पीडितेच्या वडिलांनी समाधान व्यक्त केले. "माझ्या मुलीसोबत जे कृत्य त्याने केले, त्यानंतर त्याला जगण्याचा कोणताही अधिकार नव्हता. पोलिसांनी खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिला आहे," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आरोपीचा गुन्हेगारी इतिहास पाहता, २०२५ मध्ये त्याने आपल्या मेहुणीवर चाकूने हल्ला केला होता आणि त्यानंतर एका विनयभंगाच्या प्रकरणातही त्याला अटक झाली होती.

वारंवार गुन्हे करूनही तो जामिनावर बाहेर येत होता, मात्र यावेळच्या कृत्याने त्याच्या पापाचा घडा भरला. ज्याप्रमाणे बदलापूरच्या घटनेतील आरोपी अक्षय शिंदेचा पोलीस व्हॅनमध्ये गोळीबार केल्यानंतर एन्काउंटर झाला होता, किंवा हैदराबादमधील बलात्कार प्रकरणातील चारही आरोपींना पोलिसांनी घटनास्थळी नेले असता त्यांनी पळण्याचा प्रयत्न केला आणि ते चकमकीत मारले गेले, अगदी तशाच स्वरूपाची कारवाई गाझियाबाद पोलिसांनी केली आहे. कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी आणि पीडितेला त्वरित न्याय देण्यासाठी अशा कडक पावलांची चर्चा आता देशभर होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पंजाब किंग्जने लखनौला 54 धावांनी नमवत मिळवला सलग पाचवा विजय

■ मुंबई, वृत्तसंस्था :

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या पंजाब किंग्ज संघाने लागोपाठ पाचव्या विजयाची नोंद केली आहे. स्पर्धेतील २९ वा सामना पंजाब किंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडलेल्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने पहिल्या डावात ७ गडी बाद २५४ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना लखनौला २०० धावांपर्यंत मजल मारता आली. यासह पंजाब किंग्जने हा सामना ५४ धावांनी आपल्या नावावर केला.

पंजाब किंग्जने आयपीएल २०२६ स्पर्धेतील सर्वोत्तम धावसंख्या उभारली होती. त्यामुळे लखनौ सुपर जायंट्सला हा सामना जिंकण्यासाठी इतिहास घडवायचा होता. पण कुठलाही फलंदाज प्रियांश आर्य आणि कुपर कॉनोलीसारखी मोठी खेळी करु शकला नाही. सलामीला आलेल्या मिचेल मार्श आणि आयुष बदोनीने ६१ धावांची खेळी केली. मिचेल मार्शने २८ चेंडूत ४० धावांची खेळी केली.

तर आयुष बदोनीने २१ चेंडूत ३५ धावांची खेळी केली. तर कर्णधार ऋषभ पंतने हातभार लावत २३ चेंडूत ४३ धावांची खेळी केली. पंतने या खेळीदरम्यान ६ षटकार मारले. निकोलस पूरनकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण तो अवघ्या ९ धावा करुन माघारी परतला. शेवटी एडेन मारक्रमने ४२ धावांची खेळी केली. तर मुकुल चौधरीने नाबाद २१ धावांची खेळी केली. लखनौचा संघ विजयापासून ५४ धावा दूर राहिला. लखनौ सुपर जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या पंजाब किंग्जला सुरुवातीला मोठा धक्का बसला. सलामीवीर फलंदाज प्रभसिमरन सिंग शून्यावर माघारी परतला. त्यानंतर प्रियांश आर्य आणि कुपर कॉनोलीने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी १८५ धावांची भागीदारी केली. दोघांनाही शतक झळकवण्याची संधी होती. पण त्यांनी आपल्या शतकाचा विचार न करता फटकेबाजी सुरूच ठेवली. या प्रयत्नात दोघेही बाद झाले. प्रियांश आर्य ९३ धावांवर बाद झाला. तर कुपर कॉनोलीने ७ षटकारांचा साहाय्याने ८७ धावांची खेळी केली. शेवटी फलंदाजी करताना मार्कस स्टोइनिसने २९ धावांची खेळी केली. तर नेहाल वढेराने १३, शशांक सिंगने १७ धावांची खेळी केली.




# इतिहासातील बेस्ट स्टम्पिंग? ध्रुव जुरेलची जगभर चर्चा; VIDEO झाला व्हायरल..

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेत रविवारी डबल हेडर सामन्यांचा थरार पाहायला मिळाला. पहिल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्स संघाला अवघ्या १५५ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना कोलकाता नाईट रायडर्स संघाने १९.४ षटकात ६ गडी राखून विजयाची नोंद केली. राजस्थानने या सामन्यावर आपली पकड मजबूत केली होती. पण रिंकू सिंगने कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी विजय खेचून आणला. यादरम्यान ध्रुव जुरेलने केलेली स्टम्पिंग चर्चेत राहिली. कॅमेरुन ग्रीनला बाद करण्यासाठी त्याने भन्नाट वेगाने स्टम्पिंग केली, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.




या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा संघ अवघ्या १५६ धावांचा पाठलाग करत होता. या हंगामातील रेकॉर्ड पाहता, १५६ धावांचं आव्हान फार मोठं नव्हतं. पण कोलकाताला हवी तशी सुरुवात करता आली नाही. टीम सेफर्ट आणि अजिंक्य रहाणे शून्यावर माघारी परतले. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कॅमेरुन ग्रीनने डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. त्याने काही फटके मारले. पण तो देखील रवी बिश्नोईच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. कॅमेरुन ग्रीन आक्रमक फलंदाजी करत असताना राजस्थान रॉयल्सकडून रवी बिश्नोई ५ वे षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला. या षटकातील तिसऱ्या चेंडूवर ग्रीनने पुढे येऊन मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा प्रयत्न फसला. रवी बिश्नोईने अंदाज घेत, लेग साईडच्या दिशेने चेंडू टाकला. त्यामुळे ग्रीनच्या बॅटचा आणि चेंडूचा कुठलाही संपर्क झाला नाही. तर दुसरीकडे यष्टिरक्षण करत असलेल्या ध्रुव जुरेलने लेग साईडच्या बाहेर असलेला चेंडू पकडला आणि तोल गेला असतानाही स्टंपवर अचूक निशाण साधला. निर्णय तिसऱ्या अंपायरकडे गेला आणि तो बाद असल्याचं स्पष्ट झालं. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

# राजस्थानने सामना गमावल्यानंतर वैभव सूर्यवंशी मैदानातच ढसाढसा रडला

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. कोलकात्यातील इडन गार्डन्सच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सकडे विजय मिळवण्याची संधी होती. पण रिंकू सिंगने राजस्थानच्या तोंडचा घास पळवला. राजस्थानने पहिल्या डावात फलंदाजी करताना १५५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना रिंकू सिंगने दमदार अर्धशतकी खेळी केली. हा कोलकाता नाईट रायडर्सचा पहिलाच विजय ठरला. दरम्यान हा सामना गमावताच वैभव सूर्यवंशी रडत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

वैभव सूर्यवंशी हा राजस्थान रॉयल्सचा या हंगामातील सर्वात यशस्वी फलंदाज आहे. तो ऑरेंज कॅपच्या शर्यतीत देखील आहे. कोलकाता नाईट रायडर्सविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने ४६ धावांची खेळी केली. हा सामना झाल्यानंतर सोशल मीडियावर एक व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. ज्यात तुम्ही पाहू शकता की, वैभव सूर्यवंशी रडताना दिसून येत आहे. त्यावेळी कोलकाता नाईट रायडर्स संघाने क्षेत्ररक्षण प्रशिक्षक दिशांत याग्निक येतात आणि त्याला धीर देतात. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या सामन्यात वैभव सूर्यवंशीकडे अर्धशतक झळकावण्याची संधी होती. पण त्याचं अर्धशतक अवघ्या ४ धावांनी हुकलं. या खेळीदरम्यान त्याने मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे. १३ डावांनंतर सर्वात जास्त षटकार मारण्याच्या रेकॉर्डमध्ये त्याने ग्लेन मॅक्सवेलला मागे टाकलं आहे. आतापर्यंत वैभवने १३ डावांनंतर सर्वाधिक ४४ षटकार खेचले आहेत. याआधी हा रेकॉर्ड ग्लेन मॅक्सवेलच्या नावावर होता. त्याने १३ डावांनंतर ३३ षटकार खेचले होते.

# रिंकू सिंगने मिळवून दिला KKR ला पहिला विजय; राजस्थानला 'या' २ चुका महागात पडल्या

■ सेंट लुइस/वृत्तसंस्था

कोलकाता नाईट रायडर्सचा स्टार फिनिशिर रिंकू सिंगवर जोरदार टीका केली जात होती. गेल्या काही सामन्यांमध्ये तो नावाला साजेशी कामगिरी करू शकला नव्हता. पण राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात रिंकू सिंग हा कोलकाता नाईट रायडर्ससाठी मॅचविनर ठरला आहे. कोलकाताचा संघ १५६ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. यादरम्यान कोलकाताला सुरुवातीला मोठे धक्के बसले होते. पण शेवटी रिंकू सिंगने कोलकाताला विजय मिळवून दिला. यादरम्यान झालेल्या २ चुका राजस्थान रॉयल्सला चांगल्याच महागात पडल्या.




कोलकाता नाईट रायडर्सला हा सामना जिंकण्यासाठी १५६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पुन्हा एकदा कोलकाताची फ्लॉप सुरुवात झाली. टीम सेफर्ट आणि अजिंक्य रहाणे दोघेही शून्यावर माघारी परतले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेला अंगकृष रघुवंशी अवघ्या १० धावा करून माघारी परतला. कॅमेरुन ग्रीनने हातभार लावत २७ धावा केल्या. तर रोमन पॉवेलने २३ धावा केल्या. शेवटी रिंकू सिंग आणि अनुकूल रॉयने मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. रिंकू सिंगने नाबाद ५३ तर अनुकूल रॉयने नाबाद २९ धावांची खेळी करून कोलकाताला पहिला विजय मिळवून दिला. रिंकू सिंग या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या विजयाचा हिरो ठरला. तो शेवटपर्यंत उभा राहिला आणि कोलकाताला विजयाचं खातं उघडून दिलं. पण रिंकू सिंग ज्यावेळी अवघ्या ८ धावांवर फलंदाजी करत होता, त्यावेळी जडेजाच्या गोलंदाजीवर नांद्रे बर्गरने त्याचा सोपा झेल सोडला. त्यानंतर ४ प्रमुख गोलंदाजांचे षटक शिल्लक असताना रियान पराग स्वतः गोलंदाजी करण्यासाठी आला. १५ व्या षटकात रिंकू सिंगने रियान परागच्या षटकात १० धावा वसूल केल्या.


या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी मिळून दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ८१ धावा जोडल्या. यशस्वी जैस्वालने ३९ तर वैभव सूर्यवंशीने ४६ धावांची खेळी केली. ध्रुव जुरेल ५ धावा करून माघारी परतला. तर कर्णधार रियान पराग अवघ्या १२ धावा करू शकला. शेवटी शिमरोन हेटमायरने १५ धावा केल्या. तर डोनोवन फरेराने ७, रवींद्र जडेजाने ९ आणि जोफ्रा आर्चरने ८ धावांची खेळी केली. चांगली सुरुवात मिळूनही राजस्थानला २० षटकांअखेर ९ गडी बाद १५५ धावा करता आल्या.

# ‘ढसाळ’ चरित्रपटाचा दमदार पोस्टर लाँच; नामदेव ढसाळांचा संघर्षमय प्रवास रुपेरी पडद्यावर

दलित पँथर आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित ‘ढसाळ’ या चरित्रपटाचे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती’च्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. मुंबईत हजारोंच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. एक ऑक्टोबर रोजी हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे. ललित प्रभाकर नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेत झळकणार असून, पोस्टरमधून त्यांच्या लुकची प्रभावी झलकही समोर आली आहे.

संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत वरुणा मदनलाल राणा निर्मित या चित्रपटात नामदेव ढसाळ यांच्या संघर्षमय आणि ज्वलंत जीवनप्रवासाचे वास्तववादी चित्रण पाहायला मिळणार आहे. वरुणा राणा लिखित व दिग्दर्शित आणि प्रताप गंगावणे यांच्या संवादांनी सजलेल्या या चित्रपटातून अन्याय आणि शोषणाविरुद्ध नामदेव ढसाळ यांनी उभारलेला लढा, त्यांच्या लेखणीतून पेटलेली क्रांती आणि समाजमनाला हादरवून टाकणारे विचार यांचा ठसा उमटणार आहे. संगीतकार इलैयाराजा यांचे संगीत लाभले आहे. गीतकार इर्शाद कामील, गुरू ठाकूर यांनी गाणी लिहिली आहेत. ललित प्रभाकरचे नामदेव ढसाळांच्या रूपात रूपांतर प्रख्यात रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी केले आहे.






यावेळी दिग्दर्शिका वरुणा राणा म्हणाल्या, नामदेव ढसाळ हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हे, तर एक प्रक्षोभक विचार आहेत. त्यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांच्या कवितेतील विद्रोह आणि समाजाला विचार करायला भाग पाडणारी त्यांची भूमिका पडद्यावर मांडणे हे मोठे आव्हान आहे. हा चित्रपट केवळ एका कवीची कथा नसून, तो एका चळवळीचा, एका विचारप्रवाहाचा आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचा दस्तऐवज आहे. ‘ढसाळ’च्या माध्यमातून आम्ही त्यांच्या विचारांची ज्वाला आजच्या पिढीपर्यंत पोहोचवत आहोत.

ललित प्रभाकर म्हणाला, ही भूमिका मिळाल्यावर सर्वात मोठं आव्हान होतं, नामदेव ढसाळांसारखं दिसणं. त्यासाठी दिग्दर्शिका वरुणा राणा आणि रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी अथक प्रयत्न केले. पहिल्या लुक ट्रायलला मल्लिका नामदेव ढसाळ यांनी “अगदी असाच दिसायचा नामदेव!” असं म्हटल्यावर आम्हाला मोठा दिलासा मिळाला. या भूमिकेमुळे त्यांच्या विचारांशी आणि संघर्षांशी अधिक जवळून परिचय झाला.

रंगभूषाकार श्रीकांत देसाई म्हणाले, ज्या चित्रपटाच्या संहिता मला भावतात त्या नक्की मला करायला आवडतात. वरुणा मॅडमना भेटलो त्यावेळी त्यांनी मला संहिता आणि दादांचे जुने फोटो दाखवले. मुळात वरुणाजींनी ४-५ वर्षे ह्या विषयाचा अभ्यास केलाय. असे फार कमी दिग्दर्शक असतात. नामदेव ढसाळांना प्रत्यक्षात उतरवताना आव्हान तर होतेच पण ढसाळ म्हणजेच संघर्ष आणि हा संघर्ष प्रेक्षकांना पाहायला नक्की आवडेल.

## तन्वी कोलते ठरली 'बिग बॉस मराठी ६'ची विजेता; रितेश भाऊंनी ट्रॉफीसोबत दिली 'ही' खास भेटवस्तू

रितेश देशमुख होस्ट करत असलेला 'बिग बॉस मराठी ६' चा ग्रँड फिनाले थाटामाटात पार पडला. तन्वी कोलते 'बिग बॉस मराठी ६'ची विजेता ठरली, तर राकेश बापट उपविजेता झाला. टॉप ५ मध्ये विशाल कोटीयन, राकेश बापट, अनुश्री माने, दिपाली सय्यद आणि तन्वी कोलते होते. आता सोशल मीडियावर तन्वी कोलतेची चर्चा पाहायला मिळत आहे. विजेत्या तन्वी कोलतेला खूप भेटवस्तू मिळाल्या. ती 'बिग बॉसची क्वीन' आणि बिग बॉसच्या घरातील 'टास्क क्वीन' ठरली.

तन्वी कोलतेला 'बिग बॉस मराठी ६' ची चमकदार ट्रॉफी मिळाली. त्यानंतर तब्बल १५ लाखांचा चेक मिळाल. तसेच पु.ना.गाडगीळ आणि सन्स यांच्याकडून १० लाखांचे Voucher आणि तुनवाल ई-मोटर्सकडून ई-बाईकही मिळाली. सध्या सर्वत्र तन्वी कोलतेचे कौतुक होत आहे. तिच्यावर शुभेच्छांचा आणि प्रेमाचा वर्षाव होत आहे.

'बिग बॉस मराठी ६' ची विजेता तन्वी कोलतेला रितेश भाऊंनी देखील एक खास



भेट वस्तू दिली आहे. त्यांनी तन्वीला छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेली फ्रेम गिफ्ट केली आहे. जिला पाहून तन्वी खूप भावुक झाली आणि तिला आनंद झाला. रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी' चित्रपट २ मे ला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. रितेशचा हा ड्रीम प्रोजेक्ट आहे. 'बिग बॉस मराठी ६' ची ट्रॉफी जिंकल्यावर तन्वी कोलतेने सर्वांचे आभार मानले. ती म्हणाली की, "१०० दिवसांनी ही ट्रॉफी माझ्या हातात आली आहे. बिग बॉसची ट्रॉफी जिंकण्याचे माझे स्वप्न होते. मी आई-बाबांना नेहमी सांगायची की मला 'बिग बॉस'मध्ये जायचे आहे. कारण हा शोमुळे आपल्याला स्वतःच्या नावाने ओळख मिळते. मी तन्वी कोलते म्हणून आले होते आणि आज तन्वी कोलते हा ब्रँड मिळवून जातेय..."

## विराटच्या मदतीला धावली 'ती' इन्फ्लुएन्सर

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्माचा नवरा आणि भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली पुन्हा एकदा इन्स्टाग्रामवर एका फोटोला 'लाईक' केल्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. गेल्या वर्षी, विराट कोहलीने टीव्ही अभिनेत्री अवनीत कौरच्या एका फोटोला 'लाईक' केले होते, यामुळे बरीच चर्चा रंगली होती. आता, या क्रिकेटपटूने जर्मन इन्फ्लुएन्सर 'LizLaz' (लिझलैज) हिने पोस्ट केलेल्या काही 'बोल्ड' फोटोंना 'लाईक' केले आहे. त्यानंतर त्याने स्पष्टीकरण दिले की, ही कृती चुकून घडली होती आणि त्याचा मुलगा 'अकाय कोहली' याच्या हातात फोन असताना हे घडले होते.



विराट कोहली सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर 'ट्रोल' होत आहे. यामुळे, ज्या इन्फ्लुएन्सरच्या फोटोला या क्रिकेटपटूने 'लाईक' केले होते, तिने आता या घटनेबाबत आपले मौन सोडले आहे. हिंदुस्तान टाइम्सशी साधलेल्या संवादात, लिझलैजने सांगितले की, विराट कोहलीने नेमक्या कोणत्या वेळी तिच्या फोटोला 'लाईक' केले किंवा त्यानंतर तो 'लाईक' काढून घेतला याबद्दल तिला काहीच कल्पना नव्हती. विशेष म्हणजे, लिझलैजला उलट विराटबद्दलच खूप वाईट वाटत आहे. जेव्हा त्या इन्फ्लुएन्सरला विचारण्यात आले की, जेव्हा तो फोटो 'अनलाईक' करण्यात आला, तेव्हा तिला दुखावले गेल्यासारखे किंवा निराश झाल्यासारखे वाटले का? त्यावर तिने असे उत्तर दिले, "नाही, खरे सांगायचे तर, मला उलट त्याच्याबद्दलच थोडे वाईट वाटले. त्याने माझ्या फोटोला 'लाईक' केले होते, याचा मला खूप आनंद झाला होता. पण त्यानंतर, जेव्हा त्याने तो 'अनलाईक' केला, तेव्हा मला त्याच्याबद्दल थोडे वाईट वाटले. कारण, ही गोष्ट इतकी मोठी बातमी कशी बनली, हे मला अजूनही समजलेले नाही. लोकांना हे नेमके कसे लक्षात आलं? त्यांनी याला बातमीचे स्वरूप कसं दिलं? कदाचित त्याचा तसा काहीच हेतू नसावा. तरीही, मी याबद्दल कृतज्ञ आहे आणि त्याच्याकडून मला मिळालेल्या पाठिंब्याचे मी मनापासून कौतुक करते."

## ५ लाख घेण्यास नकार, दिपाली सय्यद एलिमिनेट झाल्यावर नेटकरी म्हणाले..

बिग बॉस मराठीच्या टॉप ५ राकेश बापट, तन्वी कोलते, विशाल कोटियन, अनुश्री माने व दिपाली सय्यद या स्पर्धकांपैकी आता टॉप ३ उरले आहेत. दिपाली सय्यद १०० दिवसांच्या प्रवासानंतर पाचव्या क्रमांकावर एलिमिनेट झाली. तर अनुश्री माने चौथ्या क्रमांकावर बाद झाली. फिनालेतील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे रितेश देशमुखने पैसे घेऊन स्वतःला एलिमिनेट करण्याची ऑफर या पाच स्पर्धकांना दिली होती, पण सर्वांनीच नकार दिला. अखेर कमी मतांच्या आधारे ५ व्या क्रमांकावर बाद होणाऱ्या स्पर्धकाचं नाव रितेश देशमुखने जाहीर केलं. दिपाली सय्यद घराबाहेर पडली, त्यानंतर नेटकऱ्यांनी तिचा निर्णय व एलिमिनेशन यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.

झालं असं की टॉप ५ पैकी टॉप ४ निवडायचे होते. त्यामुळे पाचही स्पर्धकांना होस्ट रितेश देशमुखने एक ऑफर दिली. बझर वाजवून पैशांची बॅग घेऊन बाहेर पडायचं, अशी ती ऑफर होती. आधी ३ लाख रुपये, नंतर ४ लाख रुपये आणि शेवटी ५ लाख रुपयांची ऑफर रितेश देशमुखने दिली. पण पाचही जणांनी ती नाकारली. अखेर





दिपाली सय्यद पाचव्या क्रमांकावर बाद झाली.

कलर्स मराठीच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून यासंदर्भात पोस्ट करण्यात आली आहे. या पोस्टवर नेटकऱ्यांनी दिपाली सय्यदचा निर्णय व एलिमिनेशन यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'उत्तम प्रवास', 'दिपाली खूप चांगलं खेळली', 'दिपाली तू बेस्ट आहेस', 'आता तुला टीव्हीवर पाहता येणार नाही, '५ लाख घ्यायला पाहिजे होते,' 'दीपाली ताई छान खेळला तुम्ही, पण? घ्यायला पाहिजे होते सगळे घ्या म्हणत होते,' 'पैसे घ्यायला हवे होते,' '५ लाख मिळाले असते पण मोठी चूक केली,' 'आपलेच गद्दार निघाले आता तरी समज, बाहेर आल्यावर आता तरी त्यांची बाजू नको घेऊस,' अशा कमेंट्स या पोस्टवर पाहायला मिळत आहेत. एकूणच कमेंट्स पाहता प्रेक्षकांना दिपालीचा हा निर्णय फारसा पटला नाही.

दरम्यान, बिग बॉस मराठी सीझन ६ चा प्रवास दिपाली सय्यदसाठी चढ-उतारांनी भरलेला राहिला. अनेकांशी वाद झाले, भांडणं झाली, त्याचबरोबर ती घरात असताना तिच्या सासूबाईंचं निधन झालं. त्यामुळे ती त्यांना शेवटचं पाहूही शकली नाही.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पशुधनासाठी १९६२ हेल्पलाईन ठरतेय जीवनवाहिनी; वर्षभरात ६४ हजार जनावरांना मिळाले जीवदान

**जनसंचलन/बुलढाणा**

पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असून जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने सुरू केलेली १९६२ ही टोल फ्री हेल्पलाईन आणि मोबाईल वेटरनरी क्लिनीक यांच्यातील तांत्रिक समन्वयामुळे पशुपालकांना त्यांच्या दारापर्यंत पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध झाली आहे. या सुविधेमुळे केवळ उपचारांमधील वेळच वाचला नाही, तर दुर्गम भागातील हजारो पशुधनास वेळेत गोल्डन अवर मध्ये उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. पशुसंवर्धन आयुक्तालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षभरात या कॉल सेंटरकडे एकूण ४,०१,९९२ कॉल्स प्राप्त झाले. त्यापैकी ३,७८,०३५ पशुधनाच्या आजारविषयक समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे. विशेषतः दुर्गम व डोंगराळ भागातील ३४,९७९ पशुपालकांनी या सुविधेचा लाभ घेतला असून त्यांच्यासाठी ही सेवा खऱ्या अर्थाने लाईफलाईन ठरली आहे. अपघात, विषबाधा किंवा कठीण प्रसूती अशा आपत्कालीन स्थितीत कॉल आल्यानंतर अवघ्या दीड तासात पशुवैद्यकीय पथक प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचते. या तत्परतेमुळे ६४,७५९ पशुधनाचे प्राण वाचले असून यामध्ये २९,१३० मोठे व ३५,५६९ लहान पशुधनाचा समावेश आहे. या हेल्पलाईनद्वारे आजारी जनावरांवर तातडीचे उपचार, शस्त्रक्रिया, लसीकरण, कृत्रिम रेतन, वंध्यत्व तपासणी आणि अपघाती सेवा पुरविल्या जातात. याशिवाय चॅटबॉटद्वारे माहिती आणि शासकीय योजनांची माहितीही पशुपालकांना दिली जाते. पूर्वी किरकोळ आजारासाठीही जनावरांना दवाखान्यात नेणे जिकिरीचे व महागडे ठरत असे, परंतु आता तज्ज्ञ पशुवैद्यक स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत असल्याने संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखणेही सुलभ झाले आहे. यामुळे दुग्धव्यवसाय हा एक शाश्वत व फायदेशीर व्यवसाय म्हणून आकारास येत आहे. आगामी काळात ही सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता () आधारित प्राथमिक सल्ला आणि व्हॉट्सॲप चॅटबॉट यांसारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे नियोजन असल्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे. या प्रगत प्रणालीमुळे प्रत्येक कॉलचे अचूक ट्रॅकिंग करणे आणि दुर्गम भागातील गरजांचे विश्लेषण करून अधिक नियोजनबद्ध काम करणे शक्य होणार आहे. डिजिटल क्रांतीची ही जोड पशुधनाची हानी कमी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी देणारी ठरेल.

# बुलढाण्याच्या ओमिक भाकडेचा राष्ट्रीय तिरंदाजीत झंझावाती पराक्रम देशात दुसरा क्रमांक....

## गुंटूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत दोन पदकांची कमाई




**जनसंचलन/बुलढाणा**

आंध्र प्रदेशातील गुंटूर येथे नुकत्याच पार पडलेल्या १५ व्या एन.टी.पी.सी चेचुकरी लेनिन ढोला स्मृती राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत बुलढाण्याच्या ओमिक भाकडे याने दमदार कामगिरी करत देशातून दुसरा क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. ही स्पर्धा मिनी (अंडर-१५), ७ वी किड्स (अंडर-१०) व २ री किड्स (अंडर-१३) अशा विविध गटांमध्ये पार पडली. अंडर-१३ गटात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत ओमिक भाकडे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्य व कांस्य अशी दोन पदके पटकावली. सलग दोन दिवसांत दोन पदकांची कमाई करत ओमिकने आपली सातत्यपूर्ण गुणवत्ता सिद्ध केली. त्याच्या या यशामुळे राज्यासह बुलढाणा जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले आहे. वशेष म्हणजे, यापूर्वी सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत ओमिकने राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. कठोर मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्याने राष्ट्रीय स्तरावर आपली ठसठशीत छाप पाडली आहे. ओमिकच्या यशामागे आंतरराष्ट्रीय तिरंदाजी प्रशिक्षक व छत्रपती पुरस्कार विजेते चंद्रकांत इलग सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. ओमिकच्या या उज्ज्वल यशामुळे बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राचा अभिमान उंचावला असून सर्व स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# एल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यात जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय हवामान विभागाने २०२६ च्या मान्सूनवर एल-निनोचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पशुधनाच्या संरक्षणासाठी आणि संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि तातडीचे निर्देश दिले आहेत. राज्यात सर्वसाधारणपणे हिरव्या चाऱ्याची ४३.९८% तर सुक्या चाऱ्याची २५.१२% तूट असते आणि पाऊस कमी झाल्यास ही तूट वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने जिल्हा नियोजन व विकास समिती अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना किंवा आपत्ती निवारण निधीतून चारा बियाणे खरेदीला प्राधान्य द्यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या दर्जेदार चारा बियाणांचे कार्यारंभ आदेश महाबीज अकोला यांना ५ मे २०२६ पूर्वी देऊन बियाणे शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील पशुधनाची संख्या विचारात घेऊन स्वतंत्र जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या आराखड्यांतर्गत धरणांचे गाळपेरा क्षेत्र व नदीपात्रालगत चारा लागवड करणे, मुरघास प्रकल्पांना गती देणे आणि भविष्यात चारा छावण्यांची गरज भासू नये यासाठी आतापासूनच साठवणुकीचे अचूक नियोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. पशुसंवर्धन विभागाने या मोहिमेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून वैरण बियाणे वाटप, हायड्रोपोनिक चारा उत्पादन, मिनी टीएमआर आणि कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप अशा विविध योजना राबवल्या जात आहेत. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी पशुपालकांना मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेण्याचे आणि आधुनिक तंत्रांचा वापर करून चारा साठवणूक करण्याचे आवाहन केले आहे.

# उष्णलहरींच्या पार्श्वभूमीवर पशुधनाची काळजी घेण्याचे पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात वाढत्या तापमानाची शक्यता आणि एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या उष्णलहरींचा धोका लक्षात घेता, पशुसंवर्धन विभागाने पशुपालक व कुक्कुटपालकांसाठी विशेष मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पशुधनावर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी जिल्हा स्तरावरील सर्व पशुवैद्यकीय संस्थांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले असून, पशुपालकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. उष्णलहरींच्या काळात पशुधनाला पुरेसे स्वच्छ आणि थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जनावरांच्या आहारात क्षार मिश्रणे, जीवनसत्त्वे आणि संतुलित आहाराचा समावेश असावा. विशेषतः शेती किंवा ओझे वाहणाऱ्या पशुधनाला सकाळी ११ ते सायंकाळी ४ या तीव्र उन्हाच्या काळात पूर्ण विश्रांती द्यावी आणि त्यांना सावलीत किंवा खेळती हवा असलेल्या थंड जागी बांधावे. गोठ्याचे छत उष्णता रोधक असावे किंवा त्यावर गवत टाकून पाणी मारावे. शक्य असल्यास स्प्रिंकलरचा वापर करून जनावरांच्या अंगावर पाण्याचा फवारा करावा. पशुधनामध्ये उष्माघाताची लक्षणे, जसे की धापा टाकणे, तोंडातून लाळ गळणे किंवा अस्वस्थता दिसून आल्यास त्यांना तातडीने थंड ठिकाणी हलवून शरीरावर थंड पाण्याचा मारा करावा. अशा परिस्थितीत तातडीच्या उपचारासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा १९६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. पशुसंवर्धन विभागाने सर्व दवाखान्यांमध्ये आवश्यक जीवरक्षक औषधांचा साठा उपलब्ध ठेवला असून फिरती पशुवैद्यकीय पथके देखील तैनात केली आहेत. पशुपालकांनी उन्हाच्या वेळी पशुधनाची वाहतूक करू नये किंवा त्यांना उघड्यावर बांधू नये. तसेच सायंकाळच्या दूध दोहनाची वेळ किमान एक तास उशिरा ठेवावी, जेणेकरून उष्णतेचा ताण कमी होऊन दूध उत्पादन टिकून राहील.

# मेहकर हादरलं! दृश्यममलाही लाजवेल असा खून उघड ३ वर्षांनी जमिनीखालून सांगितलं सत्य



**मेहकर**

या थरारपटालाही मागे टाकेल असा वास्तवातील भयानक गुन्हा मेहकर तालुक्यात उघडकीस आला आहे. सुकळी येथील ३४ वर्षीय विनोद नवले हा तीन वर्षांपूर्वी बेपत्ता झाला होता. मात्र, त्याचा खून करून मृतदेह चक्क जामगाव शिवारातील एका चालू ढाब्याच्या काउंटरखाली पुरल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुनील जाधव (मुख्य आरोपी) आणि विनोद नवले हे मित्र होते. पण पैशांच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादातून सुनीलने खुनाचा कट रचला. जामगाव शिवारातील बाबूभाई कुरेशी यांच्या शेतात सचिन उगले याने ढाबा सुरू केला होता. सचिनने सुनीलकडून घेतलेले कर्ज फेडता न आल्याने, एका व्यक्तीचा काटा काढण्यात मदत कर, कर्ज माफ अशी अट घालण्यात आली. तीन वर्षांपूर्वी एका रात्री विनोदला ढाब्यावर बोलावण्यात आले. तिथे मद्यप्राशनानंतर त्याची हत्या करण्यात आली. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह ढाब्याच्या कॅश काउंटरखाली गाडण्यात आला. विशेष म्हणजे, त्याच ठिकाणी तीन वर्षे व्यवहार सुरू राहिले, पण कोणालाही संशय आला नाही. २१ एप्रिल रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी जेसीबीच्या साहाय्याने उत्खनन केले असता, मृतदेहाचे अवशेष सापडले आणि या ङ्गरिअल लाईफ दृश्यमम प्रकरणाचा पर्दाफाश झाला. तीन वर्षांपासून जमिनीखाली दडलेलं सत्य अखेर बाहेर आलं असून, आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. या घटनेमुळे संपूर्ण मेहकर तालुका हादरला असून, सत्य कितीही दडवलं तरी ते बाहेर येतंच हे पुन्हा सिद्ध झालं आहे.

# पीडित महिलेला सखी वन स्टॉप सेंटर ने मिळवून दिला न्याय

**जनसंचलन/ चिखली**

बारामती जिल्हा पुणे येथील विधवा पीडित महिलेला लग्नाचे अमिष दाखवून तिला फुस लावून चिखली तालुक्यातील एका गावात वास्तव्य ठेवले दोन वर्षे चे उपभोग घेऊन पाच महिन्याची गरोदर ठेवून तिला घराबाहेर काढून दिल्याने त्या स्वस्त झाल्यामुळे ते गजानन नगर मधील काही महिलांचे संपर्कात आल्याने त्यांनी रत्नदीप यशवंत शिनगारे नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डोंगरदिवे यांच्या माध्यमातून सखी वन स्टॉप सेंटर बुलढाणा च्या माध्यमातून त्या महिलेला न्याय मिळवून न्याय मिळवून देत भोकर येथील महिला आश्रम सुलोचना महिला आश्रम मध्ये प्रवेशित केले. सविस्तर असे की बारामती तालुक्यातील एक विधवा महिला काही दिवसापूर्वी तिचे पती मरण पावल्याने तीला तिच्या नातेवाईकानी घराबाहेर केले म्हणून ती माहेरी आई वडिलांचा आधार घेऊन राहत होती तिथे चिखली तालुक्यातील एका तरुणाची व तिची भेट झाली पुढे प्रेम प्रकरणात रूपातर झाले. गोष्ट विवाह करण्याइतपत वाढली त्यामुळे त्या तरुणाने तिच्या आई वडिलांना सांगून तिला गावाकडे घेऊन आला तो स्वतः विवाहित होता हे त्याने तिच्यापासून लपवून ठेवले काही दिवसांनी त्याच्या पत्नी ला सर्व माहिती होताच त्या पीडितीला पाच महिन्याची गरोदर असतांना तिला घराबाहेर काढून दिले असता ती भटकंती करत चिखली येथे आली तेव्हा मोल मजुरी करणाऱ्या वंदना इंगळे सुषमा जाधव चंद्रकलाबाई गाडेकर या महिलांची तिची भेट झाल्याने त्यांनी लगेचच नगरसेवक रत्नदीप यशवंत शिनगारे यांच्याशी संपर्क साधला त्यांनी पूर्ण हकीकत जाणून घेऊन लगेचच मानसेवा मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत डोंगरदिवे यांच्याशी संपर्क साधला त्यावर सखी वन स्टाफ सेंटरच्या केंद्रप्रशासक आशा बोर्डे यांच्याशी संपर्क साधून सदर पीडित महिलेला बुलढाणा येथे भरती केले तेथे पाच दिवस ठेवून तिची पूर्ण वैद्यकीय तपासणी व इतर कायदेशीर मार्गदर्शन करण्यात आले व संबंधित आरोपी वर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्या पीडित महिलेला तिची वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रम व सुलोचना महिला आश्रम येथे ठेवण्यात आले आहे.

# संत नगरी शेगावात आग अनधिकृत खाद्य चौपाटी मुळे घडली घटना

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव येथील वाटिका परिसरातील अनधिकृत खाद्य चौपाटी भागात प्राथमिक माहितीनुसार दोन सिलेंडर चां स्फोट होऊन भीषण आग लागली त्यामुळे मोठे नुकसान झाले आहे काही काळ शहरात धास्तीचे वातावरण निर्माण झाले होते या परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत ठेले आणि खाद्य चौपाटी आहेत त्यातील अनेकांना फ ूड अँड ड्रग्स तर दूरच साधी नगर पालिकेची परवानगी नाही ज्या कडे प्रशासना च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नाही या आगीचे घटनेत कोणी जखमी झाले नसले तरीही या आणि इतरत्र असलेल्या अनधिकृत चौपाटी आणि ठेले दुकानावर संबंधित नगर परिषद आणि अधिकाऱ्यांचे नियंत्रण न असल्यामुळे मोठी दुर्घटना घडून येऊ शकते त्यामुळे प्रशासनाच्या बड्या अधिकाऱ्यांनी साथीने लक्ष घालून अशा अवैध दुकान चौकटी हाऊ गल्ली यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे असा सूर शहराच्या चारीही कोपऱ्यामधून घेताना दिसतो .

